दि. २४.०४.२०२४

## प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | हिंगोली |
| २ | पोलीस स्टेशन | कळमनुरी |
| ३ | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | तक्रारदार | गणपत फकीरराव बर्गे, वय ५१ वर्षे, व्यव. नौकरी शिपाई, पशु वैद्यकीय दवाखाना आखाडा बाळापुर, रा.कोपरवाडी ता.कळमनुरी जि.हिंगोली |
| ५ | आरोपी लोकसेवक यांचे नाव व हुददा व पत्ता | मोहम्मद आखीब मोहम्मद वाजीद, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी, पद ग्रामीण गृह निर्माण अभियंता, पंचायत समिती कार्यालय कळमनुरी जि.हिंगोली |
| ६ | गुन्हा घडल्याचे ठिकाण | पंचायत समिती कळमनुरी येथील जुने वसाहत निवासस्थान क्र.०६ मध्य असलेल्या इंजीनीयरचे कार्यालयात |
| ७ | मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रूपये |
| ८ | तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १८,०००/— रूपये |
| ९ | स्विकारलेली लाचेची रक्कम | १८,०००/— रूपये |
| १० | पडताळणी दिनांक | २३.०४.२०२४ |
| ११ | सापळा दिनांक | २३.०४.२०२४ |
| १२ | थोडक्यात माहिती :— यातील तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबधंक विभाग हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांची पत्नी लक्ष्मीबाई बर्गे यांचे नावे मंजुर असलेले प्रधानमंत्री आवास योजने अंर्तगत घरकुलासाठी मंजुर झालेली रक्कम १,२०,०००/—रू रक्कमेपैकी १५,०००/— रू रक्कम तक्रारदार यास प्राप्त झाली आहे. घरकुल बांधुन पुर्ण झाल्याने त्या फाईलवर सही करून उर्वरीत रक्कम १,०५,०००/— रू तक्रारदार यांचे पत्नीचे बॅक खात्यावर जमा करण्यासाठी पंचायत समिती कार्यालय कळमनुरी येथील मोहम्मद आखीब मोहम्मद वाजीद, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी पद ग्रामीण गृह निर्माण अभियंता हे २०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती.<br>त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची दि.२३.०४.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता मोहम्मद आखीब मोहम्मद वाजीद, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी पद ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी पंचासमक्ष २०,०००/— रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती १८०००/— रू लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याने निष्पन्न झाल्याने आज दि.२३.०४.२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष १८,०००/— रू लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांचे विरूध्द पोस्टे कळमनुरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोहेकॉ श्री तानाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, गजानन पवार, पो.शि. शिवाजी वाघ, चापोह शेख अकबर ॲन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर तात्काळ संपर्क करावा.

१) डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक :— मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४
२) श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक :— मोबाईल क्रमांक ९८७०२२१३७९
३) टोल फ्री क्रमांक :— १०६४
४) कार्यालयाचा फोन क्रमांक :— ०२४५६—२२३०५५
५) Website :— www.acbmaharashtra.gov.in
६) Mobile App :— www.acbmaharashtra.net
७) Facebook page :— Anti-Corruption Bureau Hingoli
८) Twitter :— Anti-Corruption Bureau, Hingoli
९) Instagram :— acb_hingoli
१०) You Tube Channel :— Anti Corruption Bureau Hingoli

कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

अनिल ब. कटके
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली